जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद
(उपचिटणीस शाखा)
दूरध्वनी क्रमांक 02472-227301 फॅक्स क्रमांक 02472-228018
Email ID- rdc1osmanabad@gmail.com

---

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.
2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी-3/सीआर-26 दि. 01.04.2020.
4. भारत सरकार, गृह विभाग यांचे आदेश क्र. 40-3/2020-DM-1(a) दि. 24.03.2020.
5. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 25.03.2020.
6. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 13.04.2020.
7. भारत सरकार, गृह मंत्रालय, यांचे आदेश क्र. 40-3/2020-डीएम-1(ए) दिनांक 14 एप्रिल 2020
8. भारत सरकार, गृह मंत्रालय, यांचे आदेश क्र. 40-3/2020-डीएम-1(ए) दिनांक 15 एप्रिल 2020

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26
दिनांक:- 15/04/2020.

विषय:- उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व सरकारी व खाजगी शाळा, खाजगी शिकवण्या/कोचिंग क्लासेस, अंगणवाड्या तसेच महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था, निवासी विद्यार्थी वसतिगृहे असलेल्या उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व मोठ्या शैक्षणिक संस्था, आश्रमशाळा, उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व क्रीडा संकुले दि. 03 मे, 2020 पर्यंत बंद ठेवणेबाबत.

**आदेश**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 3 च्या आदेशान्वये करोना विषाणूचा (COVID-19) होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व सरकारी व खाजगी शाळा, खाजगी शिकवण्या/कोचिंग क्लासेस, अंगणवाड्या तसेच महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था, निवासी विद्यार्थी वसतिगृहे असलेल्या उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व मोठ्या शैक्षणिक संस्था, आश्रमशाळा तसेच उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व क्रीडा संकुले दि. 14 एप्रिल 2020 पर्यंत बंद ठेवणेबाबत आदेशित केले आहे. ज्याअर्थी संदर्भ क्र. 6 अन्वये महाराष्ट्र



Scanned by CamScanner

शासनाने लॉकडाऊनचा कालावधी दि. 30 एप्रिल 2020 पर्यंत वाढविला आहे. संदर्भ क्र. 7 व 8 अन्वये भारत सरकारने कोव्हिड 19 या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संपूर्ण देशात लॉकडाऊनचा कालावधी दिनांक 03 मे 2020 पर्यंत वाढविला आहे.संदर्भ क्र. 4, 5 व 8 अन्वये लॉकडाऊनच्या कालावधीत करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद उपरोक्त वाचा क्र. 2 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार करोना विषाणूचा (COVID-19) होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून **उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व सरकारी व खाजगी शाळा, खाजगी शिकवण्या/कोचिंग क्लासेस, अंगणवाड्या तसेच महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था, निवासी विद्यार्थी वसतिगृहे असलेल्या उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व मोठ्या शैक्षणिक संस्था, आश्रमशाळा, उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व क्रीडा संकुले दि. 03 मे, 2020 पर्यंत बंद ठेवणेबाबत आदेशित करीत आहे.**

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना उपरोक्त वाचा क्र. 2 मधील "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" चे नियम 11 नुसार, भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 मधील तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

**(दिपा मुधोळ-मुंडे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, उस्मानाबाद.
4. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
5. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
6. जिल्हा क्रीडा अधिकारी, उस्मानाबाद.
7. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, उस्मानाबाद.
8. उपविभागीय अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
9. तहसिलदार सर्व जिल्हा उस्मानाबाद.
10. शिक्षणाधिकारी, प्राथमिक व माध्यमिक, जि. प. उस्मानाबाद.
11. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
12. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
13. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, द्वारा शासकीय तांत्रिक विद्यालय, तळमजला, उस्मानाबाद.
14. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

13/4/20

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner